# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १३६ /२०१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर सन २०१० मध्ये झालेल्या निवडणुकांमधून निवडून आलेल्या/ स्वीकृत करण्यात आलेल्या / नामनिर्देशित करण्यात आलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांची मुदत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम ४२(१) मधील तरतुदीनुसार दि. ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आली होती. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ४२(२) नुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ पूर्वी तीन महिने अगोदर प्रत्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

संदर्भ पत्र क्र.साफुपुविनि/२६३, दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये विविध प्राधिकरणाच्या निवडणूका पुढे ढकलण्यात आल्याचे सर्व संबंधित घटकांना कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून लागू केलेला असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४, नुसार सन २०१५ मध्ये विविध अधिकार मंडळांच्या / प्राधिकरणांच्या निवडणुकांसदर्भात केलेली प्रक्रिया रद्द करण्यात येत आहे.

तरी सर्व संबंधित घटकांनी याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ जा.क्र. : साफुपुविनि/३७
दिनांक :१६/०६/२०१७

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव